# प्रकरण तीन

## एकात्मिक बालविकास विभाग

**3.939 आदिवासी उपयोजनाअंतर्गत अंगणवाडी केंद्राचे बांधकाम.**

**जिल्हा परिषद ठाणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदर योजनेवर रक्कम रुपये 98,80,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

आदिवासी उपयोजना (लेखाशीर्ष 2236-1417) योजनेंतर्गत अंगणवाडी केंद्र इमारत बांधकाम सन 2016-2017 च्या वर्षासाठी रूपये 98,80,000/- निधी प्राप्त झालेला आहे. उपरोक्त बांधकामासाठी निधीचे गटस्तरावर वाटप करण्यात आलेले आहे. सन 2016-2017 या वर्षासाठी रूपये 85,80,000/- व उर्वरित रुपये 13,00,000/- मागील वर्षाच्या दायीत्वासाठी खर्च करण्यात आलेले आहे.

महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक एबावि-2010/प्र.क्र.134/का-6, दिनांक 18/11/2010 अनुसार एकात्मिक बालविकास सेवा योजना या केंद्र पुरस्कृत योजने अंतर्गत राज्यशासनाच्या नियंत्रणाखाली अंगणवाडी केंद्र चालविली जातात.

महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक एबावि-2008/प्र.क्र.173/का-6, दिनांक 15/01/2010 अनुसार अंगणवाडी केंद्र इमारतीचे बांधकाम सारख्याच स्वरूपाचे असावे यासाठी नमुना आराखडा तयार करून घेण्यात आलेले आहे.

सदर शासन निर्णयानुसार अंगणवाडी केंद्र इमारत बांधकामाबाबत सुसूत्रता राहावी यासाठी अंगणवाडी केंद्र इमारत बांधकामाच्या प्रत्येक टप्प्यावर ( बांधकामाबाबतचा निर्णय घेवून त्याबाबतचे अंतिम देयक अदा करेपर्यंत) कार्यवाही करतांना एकात्मिक बालविकास सेवा योजनेचे नियंत्रक अधिकारी म्हणून संबंधित जिल्ह्याचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) यांची मान्यता घेण्यात यावी. परंतु, अशी भूमिका नियंत्रक म्हणून योजनेचा आढावा घेतांना आढळली नाही.

ग्रामविकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र..472//वित्त -9 (33), दिनांक 09/02/2009 अन्वये 15 लाखापर्यंतची बांधकामे ग्रामपंचायतीना देण्यात यावी, असे निर्देश असल्यामुळे सदर बांधकामाचे आदेश ग्रामपंचायातीना देण्यात आलेले आहे. अंगणवाडी केंद्र बांधकामाच्या अटी व शर्तीतील क्रमांक 5 च्या अटीप्रमाणे ई-निविदा झाल्यानंतर वर्क ऑर्डेर देतेवेळी ग्रामपंचायतीने 50 टक्के निधीची मागणी करावी. तसेच ग्रामपंचायतीने तीन महिन्याच्या आत काम सुरु केले नाही, तर प्रथम हप्त्याची मागणी आली नाही म्हणजेच ती ग्रामपंचायत काम करण्यास इच्छूक नाही, असे गृहीत धरून त्या अंगणवाडी बांधकामाची प्रशासकीय मान्यता रद्द करून दुसऱ्या गरजू ग्रामपंचायतीला वळती करून देण्यात येईल. परंतु, या अटीनुसार ग्रामपंचायतीना वर्क ऑर्डेर कधी देण्यात आली, याच्या प्रती विभागाकडे नाहीत. तसेच उपरोक्त अट क्रमांक 5 अनुसार ग्रामापंचायतीने निधीची मागणी केल्याचे नस्तीवरून दिसून येत नाही. या करीता तीन महिन्यांच्या आत किती ग्रामपंचायतीने निधीची मागणी केली व किती जणांनी केली नाहीत, याचा तपशील तसेच बांधकामाच्या खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे लेखापरीक्षणास सादर करण्याविषयी विभागाला अर्धसमास क्रमांक 5, दिनांक 14/09/2017 नुसार कळविले होते. परंतु, सदर तपशील लेखापरीक्षण कालावधीत सादर करण्यात आला नाही. सदर तपशील सादर करून अनुपालन करण्यात यावे.

**3.940 इयत्ता 7 वी ते 12 वी पास मुलींना एम.एस.सी.आय.टी. प्रशिक्षण देणे.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत रक्कम रुपये 8,47,000/- खर्च करण्यात आलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर योजना महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2013/प्र.क्रं.76/पं.रा.1, दिनांक 24/01/2014 मधील अनुक्रमांक 5 मध्ये दिलेल्या सुचनानुसार योजना राबविण्यात आली आहे.

2) कोलते कम्प्युटर, रत्नागिरी व संध्या इन्फोटक, पाली (रत्नागिरी) यांचे संस्था नोंदणी प्रमाणपत्र नस्तीसोबत जोडलेले नाही.

3) राजापूर तालुक्यातील यश कम्प्युटर, पाचल येथे 88 लाभार्थी यांनी सन 2016-2017 मध्ये प्रशिक्षण कोर्स पूर्ण केलेबाबत लाभार्थी यादी मंजूर करण्यात आली आहे. परंतु, सदर लाभार्थी प्रस्ताव तपासणीस उपलब्ध झाले नाहीत. सदर संस्थेकडे एवढ्या महिलांना प्रशिक्षण देण्यासाठी पुरेशी व्यवस्थ्या व संगणक उपलब्ध असलेबाबत बालविकास प्रकल्प अधिकारी, पंचायत समिती, राजापूर यांनी वेळोवेळी पाहणी करून तशा प्रकारचा अहवाल महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, रत्नागिरीकडे सादर केलेला नाही. सदर योजनामध्ये एका कुटुंबातील एकाच व्यक्तीस लाभ देय असताना दोन-दोन व्यक्तिंना लाभ देण्यात आला आहे.

4) मंडणगड तालुक्यातील एकुण 17 लाभार्थी यांना आस्क मी कम्प्युटर येथे प्रशिक्षण घेतलेबाबत संस्थेस रक्कम रुपये 59,500/- अदा केलेली आहे. परंतु, लाभार्थी प्रस्ताव नाहीत. प्रमाणपत्र नाहीत, परीक्षा फी भरणा पावत्या नाहीत. तसेच श्री.सकपाळ, महिला व बालकल्याण विभाग कर्मचारी, पंचायत समिती, मंडणगड यांचे म्हणणे नुसार सदर योजना मंडणगड तालुक्यात राबविण्यात आलेली नाही. जर योजना राबविण्यात आली नसेल, तर अदा रक्कम जिल्हा परिषदेकडे भरणा करावी. जर योजना राबविण्यात आली असेल तर, लाभार्थी प्रस्ताव, प्रमाणपत्र, परीक्षा फी भरणा पावत्या लेखापरीक्षणास सादर करण्यात याव्यात.

5) सुयश कम्प्युटर, आबलोली, तालुका गुहागर येथे एकाच कुटुंबातील दोन व्यक्तिला लाभ देण्यात आला आहे. सदर योजनेत एका कुटुंबात एकाच व्यक्तीला लाभ देय आहे. लाभार्थी प्रशिक्षण कालावधी नमूद नाही. प्रमाणपत्र फी भरणा पावत्या नाहीत.

**3.941 90 टक्के अनुदानावर महिलांना घरघंटी पुरविणे.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत रक्कम रुपये 29,92,000/- खर्च करण्यात आलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) रत्नागिरी प्रकल्प 1 व 2 ची तपासणी केली असता प्रकल्प 1 वरील लाभार्थी यांच्या घरघंटी खरेदीच्या 9 लाभार्थी यांच्या पावत्या नस्तीसोबत जोडलेल्या नाहीत.

2) मंडणगडमधील लाभार्थी श्रीमती स्वाती संतोष दुसार यांचा घरघंटी मागणी अर्ज पंचायत समितीकडे आवक क्रमांक 1162 दिनांक 25/12/2016 चा असून महिला व बालकल्याण विभाग, पंचायत समिती, मंडणगड यांनी दिनांक 18/12/2016 रोजी जिल्हा परिषदेकडे पाठविण्यात आला असून लाभार्थी यादी मंजूरी ठराव क्रमांक 391, दिनांक 17/12/2016 ने मंजूर करण्यात आली आहे.

3) खेड 10 लाभार्थी यांनी घरघंटी खरेदी गांधी स्टोअर्स लांजा यांचे बिल क्रमांक 211 ते 220 नुसार खरेदी केले असून प्रत्येक घरघंटी रूपये 17,000/- प्रमाणे खरेदी दर्शविण्यात आली आहे. पावतीवर फक्त आटा चक्की एवढाच उल्लेख आहे. अटी शर्तीनुसार खरेदी केल्याचे दिसून येत नाही.

4) गुहागर पल्लवी प्रकाश जाधव रा. निगुंडळ यांचा मागणी प्रस्ताव नाही. 18 लाभार्थी यांच्या घरघंटी खरेदी पावत्या नाहीत.

5) राजापूर महिला व बालकल्याण विभाग यांनी 103 लाभार्थीची रक्कम 17,51,000/- लाभार्थींना वाटप केली असून लाभार्थी प्रस्ताव अथवा घरघंटीच्या खरेदी पावत्या लेखापरीक्षणास तपासणीस उपलब्ध झालेल्या नाहीत.

**3.942 90 टक्के अनुदानावर मुलींना व महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देणे.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2016-17 (परिच्छेद क्रमांक 5) -** 90 टक्के अनुदानावर मुलींना व महिलांना व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देणेकरिता रक्कम रूपये 26,77,500/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) एकात्मिक बालविकास विभागाने सदर योजना राबविताना जिल्हयातील सर्व तालुक्यातील ग्रामीण भागातील महिलांना सदर योजनेचा लाभ मिळण्यासाठी पात्र असतांना मुलींना व महिलांना व्यवसाहिक व तांत्रिक प्रशिक्षण देणेबाबतची योजना ही फक्त सात तालुक्यातच राबविण्यात आली आहे. मंडणगड व दापोली तालुक्यात सदर योजना सन 2015-2016 व सन 2016-2017 या दोन्ही वित्तीय वर्षात राबविण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर योजनेसाठी ते दोन्ही तालुके लाभापासून वंचित राहिले आहेत. बालविकास प्रकल्प अधिकारी, मंडणगड व दापोली यांना सदर योजना राबविण्याबाबत कळविण्यात आलेबाबत दिसून येत नाही.

2) तालुकानिहाय लाभार्थी यादी सभापती महिला व बालकल्याण समिती व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी समिती सभा ठराव क्रमांक 391, दिनांक 17/12/2016 नुसार 595 लाभार्थी यादी मंजूर केलेली आहे. तथापि, ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2013/प्र.क्र-76/पंरा-1, दिनांक 24/01/2014 मधील तरतुदी नुसार सबंधित लाभार्थी यांनी निवडलेल्या प्रशिक्षणाचा उपक्रम राबविण्यासाठी प्रत्येक तालुक्यात मान्यता प्राप्त संस्था उपलब्ध असलेबाबतची खातरजमा करणे आवश्यक असताना अशी कोणतीही कार्यवाही प्रथम केल्याचे दिसून येत नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परीपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र-446/ वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार जिल्हा परिषद स्तरावर राबविण्यात येणाऱ्या विविध योजनाचे नियोजन व अंमलबजावणी विशिष्ट मुदतीमध्येच पूर्ण करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

4) योजनेतील अट क्रमांक 6 नुसार लाभार्थी यांनी 10 टक्के हिस्सा रक्कम प्रथम जिल्हा परिषदेकडे भरणा करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही न करता संस्थेस वितरण केलेल्या रक्कमे मधूनच 10 टक्के लाभार्थी हिस्सा वजा करून संस्थेस 90 टक्के रक्कमाचे प्रदान करण्यात आले. त्यामुळे प्रशिक्षणासाठी संस्थेची प्रशिक्षण फी रुपये 5,000/- असलेबाबत पडताळणी करता येत नाही. याबाबत ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास-1084/सीआर/1633/56, दिनांक 19/01/1995 प्रमाणे लाभार्थी हिस्सा वसूल केल्याची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

5) लाभार्थी यादी मंजूरी नंतरच तालुकानिहाय लाभार्थी यादी व प्रशिक्षण कोर्सबाबत प्रशिक्षण संस्थांना आदेश देणे आवश्यक असताना तशी कार्यवाही न करताच प्रशिक्षण कोर्स काही तालुक्यात लाभार्थी यादी मंजूरी पूर्वीच घेण्यात आलेला आहे. उदा. 1) लांजा 40 लाभार्थी कोर्स केटरिंग / कुकिंग ठिकाण वाकेड तालुका लांजा प्रशिक्षण कालावधी दिनांक 13/10/2016 ते 13/12/2016 व्यवस्थापक राष्ट्रीय स्वयंरोजगार संस्था खेडशी, रत्नागिरी. 2) रत्नागिरी प्रकल्प 2 लाभार्थी संख्या 80 कोर्स केटरिंग / कुकिंग ठिकाण करबुडे तालुका रत्नागिरी प्रशिक्षण कालावधी दिनांक 26/10/2016 ते 18/12/2016 राष्ट्रीय युवा रोजगार विकास संस्था.

6) तालुका निहाय प्रस्तावाची तपासणी केली असता त्यात खालीलप्रमाणे अनियमितता आढळल्या:-

अ) 5 लाभार्थी वय वर्ष 18 च्या आत आहेत.

ब) एकाच लाभार्थीस दोन प्रशिक्षणाचा लाभ देण्यात आला आहे.

क) एकाच कुटुंबातील दोन व्यक्तींना लाभ देण्यात आला आहे.

ड) ब्युटिपार्लर कोर्सबाबत 36 पैकी 17 प्रस्ताव तपासणीस उपलब्ध झाले नाहीत.

7) राजापूर तालुक्यातील प्रस्तावाच्या तपासणीत अनियमितता आढळल्या आहेत. एकुण 137 प्रस्तावांपैकी 65 प्रस्ताव तपासणीस उपलब्ध झाले असून 72 प्रस्ताव तपासणीस उपलब्ध झाले नाहीत. तसेच लाभार्थी यांना मंजूर यादीनुसार केटरिंग / कुकिंगचे प्रशिक्षण कोणत्या ठिकाणी देण्यात आले, प्रशिक्षण कालावधी किती, प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षण संस्थेला कोणी-कोणी भेटी दिल्या, लाभार्थी उपस्थिती, हजेरी, प्रशिक्षण प्रमाणपत्रे इत्यादी तपासणीस उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे असा मोघमपणे केलेला खर्च लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

प्रस्ताव परिपूर्ण व प्रशिक्षण प्रमाणपत्रे उपलब्ध करून पूर्तता सादर करावी अन्यथा रक्कम रुपये 6,16,500/- वसूल करून जिल्हा परिषद खाती भरणा करावी.

8) योजनेच्या अटी शर्ती मधील अट क्रमांक 8 नुसार प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच प्रशिक्षणाची रक्कम अदा करण्यात येईल, अशी अट असतांना अशा अटीची पूर्तता न करताच अनुदान प्रशिक्षण संस्थेच्या नावावर वर्ग करण्यात आले आहे.

9) वरील प्रमाणकान्वये वितरित करण्यात आलेल्या रक्कमा सबंधित संस्थेस प्राप्त झाल्याबाबत पोच पावत्या उपलब्ध करण्यात याव्यात.

**3.943 अपुर्ण अंगणवाडी केद्रांचा बांधकामाबाबत.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** विभागाकडील पत्र क्रमांक 332/2017 दिनांक 31/10/2017 नुसार 4 योजनानिहाय अंगणवाडी केद्राचे बांधकाम अपुर्ण स्थितीत आहे.

अपुर्ण स्थितीतील 209 व नाबार्ड योजनेंतर्गत 03 एकुन 212 अंगणवाडी केद्राची वर्षनिहाय मान्यता व खर्च तसेच अंगणवाडी केंद्र विहित मुदतीत पुर्ण न केल्याची स्व़यंस्पष्ट़ खुलासा लेखापरीक्षणास सादर करुन सदर केंद्र पुर्ण करण्याबाबत अनुपालन लेखापरीक्षणास दर्शवावे.

**3.944 भारतरत्न डॉ. अे. बी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेबाबत.**

**जिल्हा परिषद नंदुरबार, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** एकात्मिक बालकल्याण विभागाने अंतर्गत भारतरत्न डॉ. ए. बी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेवर प्राप्त तरतुदींनुसार रक्कम रुपये 1,74,38,88,000/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) एकात्मिक बालविकास विभागास सन 2016-2017 या आर्थिक वर्षात भारतरत्न डॉ. अे. बी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेकरिता वरीलप्रमाणे रक्कम रुपये 18,00,00,000/- इतकी तरतुद केलेली असून त्याप्रमाणे मार्च 2017 अखेर प्रत्यक्ष खर्च रक्कम रुपये 1,74,38,88,000/- इतका खर्च केलेला आहे. सन 2016-2017 मधील रूपये 56,11,200/- इतकी अमृत आहार योजना टप्पा - 2 ची अखर्चित आहे. तरी अखर्चित रक्कम खर्च केल्याचे किंवा शासन खाती जमा केल्याचे उपयोगिता व विनीयोग प्रमाणपत्र दर्शवावे.

2) सदरचा निधी हा 22236 या लेखाशिर्षात अंगणवाडी केंद्रातील गरोदर स्त्रियांना व स्तनदा मातांना एकवेळाचा आहार देण्यासाठी सदरचा निधी पंचायत समितीस्तरावरुन एकात्मिक बालविकास प्रकल्पांना प्रदान करण्यात आलेला आहे. सदर योजनेवरील गटस्तरावर वितरीत निधी केल्याप्रमाणे त्यांचे उपयोगिता व विनीयोग प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असतांना असे प्रमाणपत्र लेखापरिक्षणास उपलब्ध करुन न दिल्यामुळे निधीच्या विनीयोगाबाबतची खात्री करता आली नाही.

3) महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, निर्णय क्रमांक आविवि -2015/प्र.क्र.78/कार्यासन- 8, दिनांक 18/11/2015 मधील (1) मधील (8) अन्वये ज्या लाभार्थ्यांना डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजने अंतर्गत एक वेळेचा पुर्ण आहार देण्यात येणार आहे, अशा महिलांना एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना घरी घेऊन जाण्यासाठी आहार (THR) देण्याची आवश्यकता राहणार नाही. तरी उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करण्यात आली किंवा नाही, याची लेखापरीक्षणास कागदपत्रे प्राप्त न झाल्याने पडताळणी करता आली नाही.

4) उपरोक्त शासन निर्णयामधील (3) मधील (3.3) मधील 1 ते 4 व (3.4) मधील 1 व 2 अन्वये या योजनेच्या सर्वकष संनियंत्रण व मुल्यमापनासाठी ज्या मार्गदर्शक पध्दती अंमलात आणणेविषयी सुचना करण्यात आल्या आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही झालेचा अहवाल लेखापरिक्षणास प्राप्त झाला नाही.

**3.945 अंगणवाडी केंद्रातील लाभार्थींना खेळणी पुरविणे**

**जिल्हा परिषद जळगांव, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** एकात्मिक बालविकास विभाग, जिल्हा परिषद, जळगांव यांचेमार्फत जिल्ह्यातील अंगणवाडी केंद्रातील लाभार्थ्यांना खेळणी पुरविणेबाबतची योजना राबविण्यात आलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ई-निविदा प्रक्रीयेमध्ये दरांचा लिफाफा उघडल्यानंतर ऑनलाईन पद्धतीने तुलनात्मक विवरणपत्र तयार होते. त्यावर निविदा समितीच्या व निविदाकारांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आलेल्या नाहीत.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 149(1) नुसार आदेश देणेपूर्वी करारनामा करुन घेऊन त्यात मक्तेदारांकडून कामाची सुरुवात करणे व ते केंव्हा पूर्ण होईल, अशा विविध प्रकारच्या अटी/ शर्ती करणे आवश्यक आहे. तसेच करारातील कोणताही अटी / शर्तीचा भंग केल्यास दंडात्मक कार्यवाहीची तरतूद करारनाम्यात करण्यात यावी. निविदा संचिकेसोबत जोडण्यात आलेला करारनामा हा साध्या कागदावर रुपये 100/- किंमतींची कोर्ट फी स्टँम्प जोडण्यात येऊन करण्यात आलेला असून त्यावर करारनामा केल्याचा दिनांक नमूद नाही. म्हणजेच पुरवठा आदेश देण्यापूर्वी करारनामा करण्यात आलेला नसल्याबाबत लेखापरीक्षणाचे स्पष्ट मत आहे.

3) जिल्हा कार्यालयाचे निविदा संचिकेमध्ये जोडण्यात आलेल्या पुरवठा चलनांवरील साठा नोंदवहीमध्ये वस्तु मिळाल्याबाबत नोंद घेतल्याबाबतच्या तारखा तसेच साठा नोंदवही पृष्ठ क्रमांक व तालुका स्तरावरील साठा नोंदवहीमधील तारखा व पृष्ठ क्रमांक यामध्ये तफावत आढळून येते

4) जिल्ह्यामध्ये एकूण 3,640 अंगणवाडी केंद्र असून तालुकानिहाय/प्रकल्पनिहाय सर्व अंगणवाडी केंद्रांना समप्रमाणात खेळणी साहित्याचे वाटप होणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे वाटप करण्यात आलेले नाही.

5) साहित्य वाटपानंतर अंगणवाडी पर्यवेक्षिका यांचे उपयोगीता प्रमाणपत्र / फलनिष्पत्ती प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आलेले नाहीत.

6) साहित्य पुरवठा चलनावर साहित्य प्राप्त करणाऱ्याने साहित्य सुस्थितीत व वापरण्यास योग्य असलेबाबाबत व साठा नोंदवहीमध्ये नोंदविलेबाबतचे प्रमाणपत्र नोंदविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे प्रमाणपत्र नोंदविण्यात आलेले नाहीत.

**3.946 ॲपल आय पॅड खरेदी बाबत.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** प्रमाणक क्रमांक 96, दिनांक 24/02/2017 अन्वये रक्कम रुपये 96,900/- राज एन्टरप्रायजेस, अहमदनगर या पुरवठादाराकडुन उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेकरीता ॲपल आय पॅड खरेदी करण्यात आलेले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अपल आय पॅड खरेदीबाबतची आवश्यकता असल्याचे दस्तऐवज नसतांना तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम 1961 मधील कलम 101 अनुसूची दोन मध्ये ॲपल आय पॅड खरेदीबाबत कुठलीही तरतुद नसतांना नियमबाह्य खरेदी करण्यात आलेली आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 79 व नियम 82 व 83(2) नुसार वार्षिक नियोजन करुन मान्यता दिलेल्या उत्पादक व पुरवठादाराकडुन खरेदी केलेली नसल्याचे दिसुन येते उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस-2014/ प्र.क्र.82/भाग-II/उद्योग 4, दिनांक 01/12/2016, नियमपुस्तिका परिच्छेद क्रमांक 3.2.3 नुसार खरेदीची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस-2014/ प्र.क्र.82/भाग-II/उद्योग 4, दिनांक 01/12/2016, नियमपुस्तिका परिच्छेद क्रमांक 4.6 नुसार खरेदी मुल्यांच्या कमीत कमी 3 टक्के इतकी अनामत रक्कम जमा करणे आवश्यक आहे. तसेच 4.6(ई) नुसार जमा अनामत वॉरंटी कालावधी संपेपर्यंत परत करण्यात येऊ नये, असे असतांना सदर खरेदीकरीता अनामत रक्कम घेण्यात आलेली नाही.

4) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस-2014/ प्र.क्र.82/भाग-II/उद्योग 4, दिनांक 01/12/2016, नियमपुस्तीका परिच्छेद क्रमांक 4.2 नुसार खरेदी अधिकारी आमंत्रणाचे पत्र तयार करील. त्यामध्ये दरपत्रक सादर करण्यासाठी दिनांक, वेळ, ठिकाण, खरेदी व्याप्ती अटी शर्ती दरपत्रक उघडण्यासाठी दिनांक, वेळ, ठिकाण, याचा सामावेश असेल विभागाच्या संकेतस्थळावर नोटीस प्रसिध्द केल्याचा दिनांकापासुन एक आठवडयाचा कालावधी देण्यात येईल, असे असतांना दरपत्रक प्राप्त दिनांक, उघडण्याचा दिनांक नाही. तसेच आमंत्रणाच्या पत्रामध्ये खरेदी वस्तू कोणत्या कंपनीच्या घ्यावयाच्या, त्या कंपनीचे नांव नोंदविण्यात आलेले आहे. त्यामुळे नियम 2.6.2 नुसार इष्टतम स्पर्धा पारदर्शकतेनुसार खरेदी करण्यात आलेली नाही

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 90 चे नमुना नंबर 32 मधील जंगम मालमत्तेच्या नोंदवहीत खरेदी साहीत्याची नोंद घेणे आवश्यक असतांना सदर खरेदी साहित्यांची नोंद घेण्यात आलेली नाही.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 79 नुसार देयके पारीत झाल्यानंतर उपप्रमाणकांच्या मागे साहित्य सुस्थितीत व चांगल्या दर्जाचे प्राप्त झालेबाबतच्या नोंदी घेणे आवश्यक असतांना त्याप्रमणे कार्यवाही न केल्याने दुबार उपप्रमाणके वापरली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही

**3.947 डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेवरील खर्चाबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, पुणे यांचे सन 2016-2017 चे लेखापरीक्षण कालावधीत डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजनेची तपासणी केली असता डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजने अंतर्गत टप्पा-1 अनुसुचित क्षेत्रातील गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना एक वेळ चौरस आहार व टप्पा-2 नुसार अनुसुचित क्षेत्रातील महिलांना सात महिने ते सात वर्ष वयोगटातील सर्व बालकांना ऋतुनुसार अतिरीक्त आहार पुरविणेचा आहे याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हाधिकारी यांचेकडील आदेश क्रमांक आदिवासी/वायो/प्रमा/16-17/148/2017/पुणे, दिनांक 29/10/2016 अन्वये जिल्हा परिषदेस अनुदान प्राप्त झाले. सदर आदेशाची प्रत नस्तीसोबत जोडलेली नाही. त्यास्तव प्राप्त अनुदान रक्कम रूपये 1,10,25,852/- बाबत पडताळणी करता आली नाही.

2) योजना राबविण्यासाठी पात्र लाभार्थी संख्या संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्रात झालेल्या गरोदर महिलांच्या माता बाल संगोपन नोंदवहीवरुन घेणे आवश्यक होते. तथापि, एकाही प्राथमिक आरोग्य केंद्राची गरोदर महिलांची पात्र यादी नस्तीसोबत जोडलेली नाही.

3) संबंधित भागाच्या अंगणवाडी सेविकेने लाभार्थी गटातून गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांना बाळंतपणानंतर 6 महिने चौरस आहाराचा पुरवठा करणेचा आहे. यासाठी प्रत्येक अंगणवाडीकरीता गावपातळीवर आहार समिती स्थापन करुन अध्यक्षांची निवड करावी. गरोदर स्त्री व स्तनदा माता आहार सदस्य समिती म्हणून काम करील. तथापि, याबाबत कार्यवाही झाल्याचे दिसुन येत नाही.

4) अंगणवाडी सेविकेने प्रती दिन प्रती लाभार्थी रूपये 25/- या खर्चाच्या मर्यादेत आहार शिजवणेचा असुन शिजवलेला आहार व उपलब्ध लाभार्थी याबाबत नोंदी तपासल्याबाबत विस्तार अधिकारी यांची दैनंदिनी नस्तीसोबत जोडलेली नाही.

5) अंगणवाडी सेविकेने प्रती आठवडा केलेला खर्च योग्य असल्याची खात्री करुन प्रकल्प अधिकारी यांनी मुख्य सेविका यांच्याकडील खर्चाचा एकत्रित अहवाल तयार करून प्रत्येक महिन्याला उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) यांना सादर करावयाचा आहे. सदरचा अहवाल उपयोगीता प्रमाणपत्र म्हणून गृहीत धरला जाईल तथापि, लेखापरीक्षण कालावधीत असे उपयोगीता प्रमाणपत्र एकत्रित मासिक अहवाल नस्तीसोबत जो डलेले नाहीत त्यामुळे योजनेची फलश्रुती झालेचे दिसुन येत नाही

6) गरोदर स्त्री व स्तनदा मातेच्या नवजात बालकांच्या वजनात झालेल्या वाढीबाबत नोंदींची माहीती ठेवलेली नाही.

7) दुसऱ्या टप्प्यामध्ये योजनेची कार्यवाही केलेबाबत उपयोगीता प्रमाणपत्र, मासिक अहवाल नस्तीसोबत जो डलेले नाही

8) योजनेतील 7 महिने ते 6 वर्ष वयोगटातील लाभार्थी बालकांची संख्या स्वतंत्र नोंदवहीवरुन घेणे आवश्यक आहे. सदर बालकांना आठवड्यातील 4 दिवस 2 केळे किंवा 1 उकडलेले अंडे देण्याचे आहे. तथापि, असा चौरस आहार मुलांना दिला असलेबाबतच्या नोंदी नस्तीसोबत नाहीत.

**3.948 अंगणवाडी केंद्रातील मुलांकरीता बेंचेस पुरवठा करणेबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदर बाबत प्रमाणक क्रमांक 235, दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रुपये 24,98,688/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) एकात्मिक बाल विकास सेवा योजना विभागाकडील जिल्हा परिषद सेस सन 2016-2017 अंतर्गत मंजूर निधी रक्कम रुपये 25 लक्ष मधून अंगणवाडी केंद्रासाठी बेंचेस खरेदी करण्यासाठी ई- निविदा सूचना क्रमांक 1/2016-17/मबाक/पॉलिमर डेस्क अन्वये ई- निविदा दिनांक 06/01/2017 रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती. ई निविदा ऑनलाईन सादर करण्याचा कालावधी दिनांक 05/01/2017 ते 12/01/2017 हा विहीत करण्यात आलेला होता. विहीत केलेला कालावधी संपल्यानंतर लगतच्या कामाच्या दिवशी सदर ई-निविदा उघडणे आवश्यक होते. परंतू, सदर ई-निविदा ही दिनांक 07/03/2017 रोजी उघडण्यात आलेली आहे. निविदेचा विहीत कालावधी संपल्यानंतर तब्बल 53 दिवसांनंतर निविदेचे तांत्रिक लिफाफे उघडण्यात आले आहेत. तरी या नियमबाहयतेबाबत साधार खुलासा सादर करण्यात यावा.

2) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग III/उद्योग-4, दिनांक 01/12/2016 सोबतचे नियम पुस्तिकेमधील परिच्छेद क्रमांक 2.9.4 अनुसार स्थानिक स्तरावर खरेदी प्रक्रिया राबविणेसाठी खरेदीदार विभागाने समिती स्थापन करावी. असे असतांना जिल्हास्तरीय खरेदी समिती नेमण्यात आलेली नाही. त्यामुळे खरेदी प्रक्रिया नियमबाहय झाल्याचे दिसून येते.

3) सदर बेंचेस, 610mmx760mmx460mm(L)x(W)x(H) अशा आकारमानामध्ये असून यापूर्वी अंगणवाडयांसाठी बस्कर पट्टया पुरविण्यात आलेल्या आहेत. अंगणवाडीतील मुलांच्या वयाच्या व उंचीचा विचार करता ते बस्कर पट्टीवर सुलभपणे बसू शकतील व बेंचेसवर त्यांना सुलभ बसता येईल किंवा नाही, याबाबत शहानिशा झाल्याची कोणतीही कागदपत्रे नस्तीसोबत नसल्याने केलेली खरेदी संयुक्तिक वाटत नाही.

4) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4, दिनांक 01/12/2016 सोबतचे नियमपुस्तिकेतील परिच्छेद क्रमांक 3.1.1.1 अनुसार खरेदी करतांना आय.एस.आय. चिन्हांकित उत्पादने खरेदी करण्याची काळजी घेण्याबाबत निर्देश आहेत. तथापि, तशी कोणतीही कार्यवाही करण्यता आलेली नसल्याने सदर नियम पुस्तिकेतील नियम क्रमांक 3.1.1.2 अनुसार प्राप्त उत्पादनाचा दर्जा तपासण्यासाठी परिशिष्ट क्रमांक 12 मधील मान्यताप्राप्त प्रयोगशाळेकडून तपासणी करुन घेणे आवश्यक आहे. तथापि, तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे योग्य दर्जाचा माल प्राप्त झाल्याची पडताळणी करता आली नाही.

5) निविदा अटी व शर्ती अनुक्रमांक 4अ मधील ब नुसार निविदा जाहिरातीनुसार कोणालाही बयाणा रकमेपासून सुट दिली जाणार नाही. अशा सुचना असतांनाही कोणत्याही निविदा धारकाने बयाणा रक्कम भरली नाही. तरीही निविदा काय आधारे उघडण्यात आली? याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

6) सदर खरेदी प्रक्रिया ही ई निविदा प्रक्रियानुसार करण्यात आलेली असून त्यास प्रतिसाद म्हणून 3 निविदा प्राप्त झाल्या असून निविदेमध्ये नमूद केलेल्या लिफाफा क्रमांक 1 मधील सर्व तांत्रिक अटी व शर्तींचे पालन तीनही निविदा धारकांकडून होत नसलेचे तुलनात्मक तक्ता व कागदपत्रांचे पडताळणी वरुन दिसून येत आहे. तीनही निविदा तांत्रिकदृष्टया पात्र नसतांनासुध्दा लिफाफा क्रमांक 2 दराचा लिफाफा उघडण्यात आला या नियमबाहयतेबाबत साधार खुलासा करावा.

7) प्रथमत: भवानी एंटरप्रायजेस यांच्या डिलीव्हरी चलनाच्या आधारे बालविकास प्रकल्प अधिकारी यांना माल प्राप्त झाल्याची व ती साठा नोंदवहीत घेतल्याचे नमूद केले असतांना पुन्हा भवानी एंटरप्रायजेस यांची चलने वापरुन अंगणवाडयांना साहित्य प्राप्त झाल्याचे दर्शविले आहे. त्यावर अंगणवाडयांच्या डेडस्टॉक वर नमूद केलेले पान क्रमांक नसल्याने अंगणवाडयांना प्रत्यक्ष साहित्य प्राप्त झाले किंवा नाही, याची पडताळणी होत नाही.

8) माल पुरवठा चलने पहाता चलनावर क्रमांक व दिनांक नमूद नाहीत. त्यामुळे प्रत्यक्ष माल विहीत मुदतीत प्राप्त झाल्याची पडताळणी करता येत नाही.

**3.949 अंगणवाडी बांधकाम अनुदान व खर्चामधील अनियमिततेबाबत**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** एकात्मिक बाल विकास सेवा योजना, जिल्हा कक्ष, जिल्हा परिषद, कोल्हापूरचे सन 2016-2017 चे लेखापरिक्षणात अर्थसंकल्पीय वार्षिक लेख्यांची पडताळणी केली असता खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2015-2016 करिता 156 अंगणवाडी बांधकामाचे उदिदष्ठ ठेवण्यात आले होते. पैकी 61 अंगणवाडयाचे बांधकाम माहे मार्च 2017 अखेर पुर्ण करणेत आले असून 50 अंगणवाडयांची बांधकामे प्रगती पथावर असल्याचे विभागाकडुन प्राप्त नियंत्रण नोंदवहीवरुन दिसते. सन 2015-2016 मध्ये जिल्हा वार्षिक योजनेतून प्राप्त अनुदानातून रककम रुपये 82,23,871/- अखर्चित आहे. तसेच सन 2016-2017 करिता रक्कम रुपये 5,00,00,000/- इतका निधी प्राप्त झाला असल्याने विभागाकडे रक्कम रुपये 5,82,23,871/- इतका निधी खर्चाकरिता उपलब्ध होता. त्याचप्रमाणे सदर निधीतून सन 2016-2017 मध्ये झालेला खर्च, केलेल्या कामाची यादी, अपुर्ण कामाची यादी, जिल्हा वार्षिक नियोजन समितीस पाठविलेला वार्षिक अहवाल लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही.

2) खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्र उपलब्ध झाली नाहीत.

3) वरीलप्रमाणे अपुर्ण कामामध्ये शासनाचा निधी गुंतुन राहिलेला असल्यामुळे संबंधित मंजूर कामापैकी प्रगतीपथावर असलेली अंगणवाडयांची बांधकामे विहित वेळेत बांधकाम विभागाकडे पाठपुरावा करुन पुर्ण होणेच्या दृष्टीने विभागाकडुन कार्यवाही होणे आवश्यक आहे. तथापि, त्याप्रमाणे विभागाकडुन कार्यवाही झालेली नाही.

4) अपुर्ण कामे किंवा कामामध्ये होणाऱ्या दिरंगाईमध्ये कंत्राटदाराने निविदा प्रक्रियेनुसार कामकाज केलेले नसेल, तर अशा कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही करणे, कामाची निविदा रद्द करणे, फेरनिविदा काढणे याप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे एकंदरच अपुर्ण कामे पुर्ण करणेबाबत गांभीर्याने लक्ष देण्यात आलेले नाही.

5) सन 2016-2017 मध्ये जिल्हा वार्षिक योजनेतून ज्या अंगणवाडयांची बांधकामे पुर्ण झालेली आहेत अशा कामांची ताबापट्टी संबंधित ग्रामपंचायती / अंगणवाडीकडे दिल्याचे लेखे पडताळणीस उपलब्ध झाले नाहीत. जी कामे पुर्ण झालेली आहेत, त्यांचे अंदाजपत्रक, मुल्यांकन, काम पुर्णत्वाचा दाखला इत्यादी लेखे विभागाने बांधकाम विभागाकडुन उपलब्ध करुन दप्तरी ठेवणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

6) सन 2015-2016 अखेर जिल्हा वार्षिक योजनेतून रुपये 82,23,871/- माहे मार्च 2017 अखेर अखर्चित होता. सदर निधी शासन निर्णयानुसार पुढील वित्तीय वर्षाअखेरीस अखर्चित राहिल्याने शासन खाती भरणा करणेबाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे.

7) अंगणवाडी बांधकामाना मंजूरी देताना उघडयावरील / भाडयाच्या इमारतीतील अंगणवाडी बांधकामांना अग्रक्रम देणे आवश्यक आहे. जिल्हयात उघडयावर / भाडयाच्या इमारतीतील अंगणवाडयांची यादी लेखापरिक्षणास सादर करावी. तसेच सन 2016-2017 या आर्थिक वर्षात प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेल्या अंगणवाडयांची त्यापैकी पुर्ण, अपुर्ण, चालू कामे सुरु न झालेल्या अंगणवाडयाची यादी लेखापरिक्षणास सादर केली नाही. त्यामुळे प्रशासकीय मान्यता देताना उघडयावरील / अभाडयाच्या इमारतीना प्राधान्य देण्यात आल्याबाबत तपासणी करता आली नाही.

**3.950 महिला व बालकल्याण विभागाकडील CPM (वेतन खाती) बँक खात्यावरील शिल्लकेबाबत**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 63 नुसार सदरच्या खात्याचे बँक ताळमेळ घेण्यात आलेला नाही. संबधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी खात्याचा बँक ताळमेळ दर महिन्यास करून घेणे बंधनकारक असताना त्याप्रकारची कार्यवाही केलेली नाही. ही बाब निश्चितच गंभीर आहे. लेखापरीक्षण कालावधीत विभागीय आयुक्त यांचेकडील पथकाची तपासणी, जिल्हा परिषद अंतर्गत लेखापरीक्षण पथकाकडून तपासणी होऊनसुद्धा याबाबत रोजकिर्दीवर कोणताही शेरा दिसून येत नाही. जिल्हा परिषद अंतर्गत लेखापरीक्षण पथकाकडून होणाऱ्या तपासणीच्या लेखापरीक्षण अहवालात याबाबत आक्षेप घेण्यात आला का कसे? याबाबत खात्री करता आलेली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 36 व मुंबई वित्तीय नियम 1959 नुसार एकाच दिवशी एकाच व्यक्तीच्या नावे दोन धनादेश काढणे नियमबाह्य असताना मे. बसव ग्राफिक्स, सोलापूर यांचे नावे दिनांक 30/03/2017 रोजी धनादेश क्रमांक 094154 ने रक्कम रूपये 4,500/- व त्याच दिवशी धनादेश क्रमांक 094152 ने रक्कम रूपये 48,000/- असे दोनदा नियमबाह्य प्रदान झालेले आहे. तरी सदरच्या प्रदानाबाबत समर्पक खुलासा लेखापरीक्षणास खुलासा सादर करावा

3) सदरच्या खात्याचा उद्देश हा जिल्हा परिषद अधिकारी / कर्मचारी यांच्या अशासकीय कपाती संबधित आहरण व संवितरण अधिकारी यांचे खातेवर जमा करून तद्नंतर अदा करण्यासाठी वापर होणे अपेक्षित आहे. सदरच्या खात्यावर रक्कम रूपये शून्य इतकी शिल्लक राहणे अपेक्षित असताना दिनांक 01/04/2016 रोजीची आरंभीची शिल्लक रक्कम रूपये 17,52,477/- इतकी तर दिनांक 31/03/2017 रोजीची अखेर शिल्लक रक्कम रूपये 16,64,624/- दिसून येते. तरी शिल्लक रकमेचा गोषवारा काढला नसल्यामुळे इतक्या मोठ्या प्रमाणात शिल्लक रक्कम कोणत्या बाबीची आहे? याचा शोध घेवून सदरची रक्कम (शासनाची अथवा जिल्हा परिषदेची असल्यास) योग्य त्या लेखाशिर्षावर भरणा केल्याबाबत लेखापरीक्षणास दर्शवावे.

4) सन 2016-2017 मध्ये रोजकिर्दीतून खर्च पडलेला असताना महारष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 15, 16 व 17 अन्वये प्रत्येक खर्चासाठी स्वतंत्र प्रमाणक क्रमांक रोजकिर्दीवर नोंदवून महारष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 79 अन्वये नमुना नंबर 29 मध्ये देयक तयार करून तसेच त्यानंतर सक्षम प्रधीकारयाची मंजुरी घेवूनच धनादेश वितरीत करणे क्रमप्राप्त असताना त्याप्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही. प्रमाणकांची स्वतंत्र संचिका ठेवण्यात आलेली नाही. उलटपक्षी केवळ रोजकिर्दीवर खर्च नोंदवून धनादेश वितरीत करण्यात आलेले आहेत. ही बाब निश्चितच गंभीर आहे.

**3.951 नावीन्यपुर्ण योजनेअंतर्गत मेळघाट मधील धारणी, चिखलदरा तालुक्यतील अंगणवाडी केंद्राकरीता Micronutrient Nutripreg खरेदी व पुरवठा करणे.**

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** नावीन्यपुर्ण योजने अंतर्गत मेळघाट मधील धारणी, चिखलदरा तालुक्यतील अंगणवाडी केंद्राकरीता Micronutrient Nutripreg खरेदी व पुरवठा करणेकरीता रक्कम रूपये 94,09,331/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त खर्चाबाबतची ई - निविदा जाहिरात अनुक्रमांक 04/ 2016-2017 अन्वये ई - निविदा पोर्टलवर आणि टाईम्स ऑफ इंडीया इंग्रजी, नागपुर या राज्यस्तरीय तसेच दैनिक जनमाध्यम, दैनिक अमरावती इव्हीनींग, साप्ताहिक पांचजन्य, हया दैनिक / साप्ताहिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आल्याचे टिपणीत नमुद आहे. महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4, दिनांक 30/10/2015 च्या नियम 4.4.2.3 नुसार रुपये 25 लक्ष वरील खर्चाबाबतची जाहिरात एका विभाग स्तरावरील वृत्तपत्रात तसेच एका राज्य स्तरावरील वृत्तपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे. परंतु, टाईम्स ऑफ इंडीया इंग्रजी, नागपुर या राज्यस्तरीय वृत्तपत्रातील जाहिरातीचे कात्रण लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही. त्यामुळे प्रत्यक्षात जाहीरात दिली किंवा नाही, याची खात्री करता आली नाही. राज्यस्तरीय वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द न

केल्यामुळे निवीदेला पुरेशी प्रसिध्दी मिळाली नाही. निविदेला पुरेशी प्रसिध्दी न मिळाल्याने स्पर्धात्मक दराचा फायदा मिळाला नाही.

2) उपरोक्त खर्चाच्या निविदेला दोनवेळा मुदतवाढ देण्यात आली. त्यानंतरही एकच निविदाधारकाने निविदा भरल्याने तिस-या वेळेच मे.फार्मावेद या कंपनीची निविदा अंतीमत: मंजुर करण्यात आली. महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4, दिनांक 30/10/2015 च्या नियम 4.4.3.1 नुसार दोनवेळा मुदतवाढ देऊनही एकच निविदा पात्र असल्यास फेर निविदा काढणे आवश्यक आहे. परंतु, त्याप्रमाणे सदर खर्चाबाबत फेरनिविदा न काढता एकच पात्र असलेली निविदा अंतीम केल्याने स्पर्धात्मक दराचा फायदा मिळाला नाही. तसेच सदर शासन निर्णयानुसार कार्यवाही झाली नाही.

3) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांचा मायक्रो न्युट्रीएन्टचा पुरवठा आदेश क्रमांक 2595 दिनांक 09/11/2016 अन्वये पंचायत समिती, धारणी अंतर्गत 10 बीट तसेच पंचायत समिती, चिखलदरा अंतर्गत 9 बीटवर पुरवठा करण्याचे आदेश होते. त्या अनुषंगाने पुरवठा केल्याचे दर्शविले आहे. परंतु, पुरवठादाराने वरील बीटवर कोणत्या वाहनाने आणि केव्हा पुरवठा केला, याबाबतचे अभिलेखे लेखापरिक्षणास तपासणीस मिळाले नाही.

4) पुरवठादाराने वरील साहित्याचा पुरवठा केल्याचे दर्शविले आहे. परंतु, बीटनिहाय साठा पुस्तकाची तपासणी केली असता साठा पुस्तकात वरील साहित्य प्राप्तीचे तारीख नमुद नाही. त्यामुळे पुरवठा आदेशातील शर्ती व अट क्रमांक 9 अन्वये पुरवठा केल्याबाबत खात्री करता आली नाही.

5) बीटनिहाय साठा पुस्तकाची तपासणी केली असता एका बीट अंतर्गत 10 ते 12 चे वर अंगणवाडया असल्याचे दिसुन येते. परंतु, बीटचे साठा रजिस्टर वरुन कोणत्या अंगणवाडीत किती लाभार्थी आहेत, (गरोदर माता आणि स्तनदा माता) याबाबत उल्लेख करण्यात आला नाही. असे असतांना बीटला प्राप्त झालेले साहित्य कोणत्या अंगणवाडीला किती प्रमाणात वाटप केले, याची खात्री करता आली नाही.

6) जा.क्र.जिप/मबाक/मक/पुरवठा 2595/2016, दिनांक 09/11/2016 चा पुरवठा आदेश आहे. परंतु, Tax Invoice No PV 2016-17-344, दिनांक 01/02/2016 असा आहे. परिणामी पुरवठा आधीच केलेला असून पुरवठा आदेश पुरवठा झाल्यानंतर निर्गमीत केल्याचे दिसून येते. टॅक्स इनव्हाइस वरुन पुरवठा सन 2015-2016 मध्ये झाल्याचे निदर्शनास येते.

7) जिल्हाधिकारी यांचे पत्र क्रमांक निधी वितरण आदेश क्रमांक 2924 दिनांक 18/03/2016 मधील अट क्रमांक 2 नुसार काम पुर्ण झाल्यानंतर पूर्णत्वाचे दाखले व उपयोगीता प्रमाणपत्र आढळुन आले नाही.

8) बालविकास प्रकल्प अधिकारी, धारणी व चिखलदरा येथील पुरवठा चलानवर प्राप्त झाल्याचा दिनांक नमुद नसल्यामुळे विहीत मुदतीत पुरवठा झाल्याची खात्री करता येत नाही.

9) लेखापरीक्षणास उपलब्ध केलेल्या बीट स्तरावरील साठापंजीची तपासणी केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश क्रमांक 2595 दिनांक 09/11/2016 मधील अट क्रमांक 2 व अट क्रमांक 7 मध्ये नमुद केल्यानुसार पूर्तता झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे स्पेसिफीकेशननुसार साहित्य प्राप्त झाले किंवा कसे, याची खात्री करता येत नाही. त्या अनुषंगाने जाहीर ई - निविदा सूचना सन 2016-2017 मधील अट क्रमांक 28 अन्वये संबंधीत विभागाकडुन कार्यवाही होणे अपेक्षीत आहे.

10) दिनांक 09/11/2016 चे पुरवठा आदेशातील अट क्रमांक 4 अन्वये मुळ आदेशाच्या रक्कमेच्या 3 टक्के रक्कम सुरक्षा ठेव रक्कम जमा केलेली नाही. सुट मिळत असल्याबाबत सादर केलेल्या प्रमाणपत्रावरुन स्पष्ट निर्देश नसल्यामुळे खात्री करता येत नाही.

11) सदर योजनेंतर्गत लाभार्थ्यांना लाभ झाल्याबाबतचा फलश्रुती अहवाल बालविकास प्रकल्प अधिकारी धारणी व चिखलदरा यांनी लेखापरीक्षणास तपासणीस सादर केला नाही. त्यामुळे या योजनेची फलश्रुती झाल्याबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

12) उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण यांनी जिल्हाधिकारी, अमरावती यांना दिलेल्या पत्र क्रमांक 149 दिनांक 28/01/2016 नुसार सदर योजनेच्या अंमलबजावणीनंतर या योजनेचे मुल्यमापन यशदा,

पुणे किंवा इतर सेवाभावी सक्षम संस्थेमार्फत करणेबाबत हमी दिली आहे. त्यानुसार मुल्यमापन केल्याबाबतचा अहवाल लेखापरीक्षणास सादर केलेला नाही. त्यामुळे सदर योजनेचे मुल्यमापन केले किंवा कसे, याबाबतचा खुलासा अभिलेख्यांसह सादर करावा.

**3.952 क्रिस्टल व्हाईट प्रोजेक्शन स्क्रीन खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 9) -** क्रिस्टल व्हाईट प्रोजेक्शन स्क्रीन खरेदीकरिता रककम रूपये 93,600/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त खरेंदी नस्ती टिपणी पान क्रमांक 6, दिनांक 04/02/2016 नुसार क्रिस्टल व्हाईट प्रोजेक्शन स्क्रीन 4X6 Ft.ची आर सी नसल्याने विहीत पद्धतीचा अवलंब करुन निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी, असे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी आदेशीत केलेले आहे. त्यानुसार विभागाने निविदा पद्धती राबविली असुन त्याद्वारे सनग्लोरी मल्टीग्रेड कंपनी, अकोला यांची सर्वात कमी किंमतीची निविदा रूपये 10,400/- असुन त्यांना पुरवठा आदेश क्रमांक 674/16, दिनांक 02/12/2016 अन्वये पुरवठा करणेबाबत सुचीत केले आहे मात्र सदर साहित्याची अपेक्षीत खर्च किंमत दर रुपये 6,000/- पेक्षा रुपये 4,400/- ने जास्त असुनही संबंधीतास आदेश दिलेला असल्याने अपेक्षीत दर व बाजार दर यामधे मोठ्या प्रमाणात तफावत आढळत असुन संबंधीतास आदेश देण्याचे प्रयोजनाबाबत खुलासा करावा.

2) लॅपटॉप व एल.सी.डी. प्रोजेक्टरचा पुरवठा दिनांक 25/04/2016 ते 27/04/2016 या दरम्यान झाला असुन त्याकरीता आवश्यक असलेले क्रिस्टल व्हाईट प्रोजेक्शन स्क्रीनची खरेदी व पुरवठा दिनांक 14/12/2016 रोजी झालेला असल्याचे लेखापरीक्षणा दरम्यान आढळते. यावरुन आठ महिने लॅपटॉप व एल.सी.डी. प्रोजेक्टर विभागाकडे पडुन असल्याचे स्पष्ट होते. योजनेस आवश्यक सर्व साहित्य एकाच वेळी खरेदी न केल्याने लॅपटॉप व एल.सी.डी. प्रोजेक्टर करीता केलेला खर्च रूपये 7,51,176/- ही रक्कम विनाकारण आठ महिने खर्ची पडल्याचे स्पष्ट होते. खुलासा करावा.

3) सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी व जिल्हा कक्षाकरीता वितरीत केलेले साहित्याबाबत साठा पुस्तकांची पडताळणी केली असता बाल विकास प्रकल्प अधिकारी, अकोला ग्रामीण क्रमांक 2 मुर्तिजापुर व तेल्हारा यांचे साठा पुस्तकात प्राप्त दिनांक नमुद नाही. त्यामुळे प्रत्यक्ष साहित्य केव्हा प्राप्त झाले, याबाबत खात्री पटत नाही. साठा विहीत मुदतीत प्राप्त झाल्याबाबत खुलासा करावा.

**3.953 आंगणवाडी कार्यकर्ता प्रशिक्षण केंद्रामधील कर्मचारी मानधन अस्थापना खर्च व उजळणी प्रशिक्षण खर्च नियमबाहय करुन शासन अनुदानाचा दुरुपयोग करणेबाबत**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** सदरबाबत रक्कम रूपये 14,32,453/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, निर्णय क्रमांक दिनांक 02/01/1992 नुसार रुपये 5,000/- वरील खर्चासाठी स्थानिक बाजारपेठेतुन तीन दरपत्रके मागवुन खरेदी करणे आवश्यक असतांना श्री. गजानन महाराज कृषी व शैक्षणिक संस्था, उंबरखेडव्दारा संचालीत अंगणवाडी कार्यकर्ता प्रशिक्षण केंद्र, उंबरखेड यांनी दरपत्रके न मागविता मोठया प्रमाणात रक्कम रूपये 4,38,488/- ची नियमबाहय खेरदी केल्याचे दिसुन येते.

सदर खरेदी केवळ मोघम किराणा खेरदी दर्शविण्यात आली. परंतु, सदर किराणा खरेदीसाठी लागणारी स्वयंपाकी मानधनाची देयके, लागणारे साहित्य जसे गंज/ तवा / जेवनासाठी प्लेट व वाटी इत्यादिचा खर्च नस्तीनुसार केला असल्याचे दिसुन न आल्याने केवळ अंगणवाडी कार्यकर्त्यावर जेवणाचा खर्च झाल्याचा आभास निर्माण करुन शासन अनुदानाचा दुरुपयोग केल्याचे दिसुन आल्याने सदर खर्च रुपये 4,38,488 /- लेखापरीक्षणास मान्य नसल्याने याची संबधीतावर जवाबदारी निश्चित करुन वसुली शासन खाती जमा दर्शवावी.

2) गॅस सिलेंडर खरेदीसाठी श्री. गजानन महाराज कृषी व शैक्षणिक संस्था, उंबरखेडव्दारा संचालीत अंगणवाडी कार्यकर्ता प्रशिक्षण केंद्र, उंबरखेड संस्थेने दिनांक 12/06/2017 ते 05/09/2017 या कालावधीसाठी रुपये

4,288/- इतका खर्च दर्शविला आहे. परंतु, प्रशिक्षण हे मार्च 2017 पर्यंत असल्याने माहे ऑक्टोबर, नोंव्हेंबर, डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी व मार्च मध्ये गॅस सिंलेंडर लागले नाही काय, याबाबत खुलासा करावा यावरुन केलेला खर्च हा मोघम सुरुपाचा केला असल्याने सदरचा खर्च लेखापरीक्षणास मान्य नसल्याने याची वसुली होणे आवश्यक आहे.

3) प्रशिक्षणासाठी सादील खर्च रुपये 18,800 /- इतका दर्शविला यामध्ये बाहेरुन टांयपींग करणेसाठी खर्च दर्शविला प्रत्यक्षात कु. अंजली सोनवणे यांना माहे ऑक्टोबर ते मार्च या कालावधीचे रुपये 56,250 /- इतके मानधन अदा केले असल्याने बाहेरुन टायपींगसाठी नियमबाहय खर्च प्रमाणके दर्शविण्यात आल्याने रुपये 18,800/- ची वसुली करणें आवश्यक आहे.

4) प्रशिक्षणासाठी श्री. संजय अग्रवाल यांची इमारत भाडयाने घेण्यात आली. परंतु, सदर इमारतीमध्ये नियमबाहयपणे इलेक्ट्रीक फीटींगसाठी महाराष्ट्र इले. कार्पो. दिनांक 26/03/2017 नुसार रुपये 15,830/- इतका खर्च करण्यात आला. भाडयाची इमारत असतांना इलेक्ट्रीक दुरुस्तीसाठी खर्च करता येत नसतांनाही नियमबाहय खर्च करुन शासन अनुदानाचा दुरुपयोग करुन शासन अनुदानाचे नुकसान केल्याने याची संबधीतावर जवाबदारी निश्चित करुन रुपये 15,830/- ची वसुली करुन शासन खाती जमा दर्शवावी.

5) अंगणवाडी कार्यकर्त्यांना क्षेत्र शैक्षणीक सहलीसाठी श्री. अशोक मुंढे यांना दिनांक 13/07/2017 रोजी रुपये 16,920/- व दिनांक 10/07/2017 रोजीसाठी रुपये 17,000/- असे एकुण रुपये 32,920/- इतका खर्च झाल्याचे दर्शविण्यात आले. परंतु, ही सहल कोठे नेली? किती लाभार्थी सोबत होते? दरपत्रके मागविण्यात आली नाही. त्यामुळे केवळ खर्च केल्याचा आभासासाठीच वरील देयके दर्शवुन शासन अनुदानाची दुरुपयोग करुन शासन अनुदानाचे नुकसान केल्याने याची संबधीतावर जवाबदारी निश्चित करुन रुपये 32,920 /- ची वसुली करुन शासन खाती जमा दर्शवावी.

6) कर्मचारी मानधन रुपये 5,81,875/- प्रदान करण्यात आले. परंतु, 9 कर्मचाऱ्यांचे सहा महिन्यांचे रुपये 120/- प्रमाणे रुपये 6,480/- व्यवसाय कराची कपात केली नसल्याने शासन महसुलाचे नुकसान झाल्याने वसुली करुन शासन खाती जमा दर्शवावी.

7) प्रशिक्षण हे खाजगी इमारतीमध्ये झाले असल्याने श्री. गजानन महाराज कृषी व शैक्षणिक संस्था, उंबरखेड व्दारा संचालीत अंगणवाडी कार्यकर्ता प्रशिक्षण केंद्र, उंबरखेड यांनी फोन व इंटरनेटसाठी रुपये 6,000/- मोघम खर्च दर्शवुन शासन अनुदानाचा दुरुपयोग करुन शासन अनुदानाचे नुकसान केल्याने याची संबधीतावर जवाबदारी निश्चित करुन रुपये 6,000/- ची वसुली करुन शासन खाती जमा दर्शवावी.

8) प्रशिक्षण केंद्र प्रत्यक्ष किती प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्यात आले, याबाबत हजेरी पत्रक उपलब्ध करुन देण्यात आले नाही. कोणत्या दिनांकामध्ये प्रशिक्षण घेण्यात आले, याबाबत कोणतीही नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. तसेच त्यांना प्रशिक्षण प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे काय व प्रशिक्षण घेण्यात आल्यानंतर त्यांना काय फायदा झाला, याबाबत अहवाल लेखापरीक्षणास सादर करावा.

9) आयुक्त, एकात्मीक बाल विकास सेवा योजना, मुंबई अनुदान वाटप आदेश क्रमांक एबाविसेयो/प्रशिक्षण/का-5/997/2017, दिनांक 25/03/2017 नुसार सदर प्रशिक्षण संस्थेस रुपये 14,32,453/- अनुदान वाटप करण्यात आलेले आहे. वाटप करण्यात आलेल्या रकमेबाबत विनियोग करण्यापूर्वी आंगणवाडी संस्थांनी त्यांना मंजूर केलेल्या सभासाठी केलेला खर्च केंद्र शासनाने विहित केलेल्या निकषाप्रमाणे असणे आवश्यक आहे. प्राप्त अनुदानाचे उपयोगीता प्रमाणपत्र संस्थेच्या प्राचार्यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण), जिल्हा परिषद यांना सादर करावे व त्याची प्रत आयुक्तलयास सादर करावी, असे असतांना उपयोगीता प्रमाणपत्र सादर केलेले नाही.

10) जिल्हातील संस्थांची कामकाजावर संबधीत उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण), जिल्हा परिषद, बुलडाणा यांचे सनियंत्रण असणे व या संस्थांना वारंवार भेटी देवून प्रशिक्षणाचा दर्जा, नियमीतपणा, प्रशिक्षणासाठी पुरविण्यात येणाऱ्या सोयी सुविधा याची वेळोवेळी पाहणी करण्यात यावी, अशा सुचना आहेत. परंतु, तशा भेटी दिल्याचे निदर्शनास आलेले नाही.

**3.954 भारतरत्न डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम अमृत आहार योजनेतील अनियमितता बाबत**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत रक्कम रूपये 1,62,45,750/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) नियमबाहय रक्क्म वर्ग करणे बाबत प्र.क 813 अन्वये सन 2015-2016 मध्ये कुपोषीत बालकांसाठी सकस आहार पुरविणे करीता रूपये 17,53,000/- अनुदान प्राप्त झाले. महिला व बालकल्याण विभागाचे पत्र क्रमांक 1562, दिनांक 30/11/2015, पत्र क्रमांक 1642, दिनांक 17/12/2015 व पत्र क्रमांक 29, दिनांक 08/01/2016 अन्वये तांत्रिक मंजुरी करीता आयुक्त यांचेकडे प्रस्ताव सादर केला असता त्या प्रस्तावाला मंजुरी न मिळाल्याने महिला व बालकल्याण समिती सभा दिनांक 10/08/2016 ठराव क्रमांक 03 नुसार सदर अनुदान अमृत आहार योजनेला वर्गकरून खर्च केलेला आहे.

वास्तविकत: सदर अनुदान कुपोषीत बालकासाठी प्राप्त झाले असतांना अमृत आहार योजनेला शासनाची परवानगी न घेता वर्ग केलेले आहे.

2) वरील योजनेला तांत्रिक मंजुरी प्राप्त केल्याचे पत्र नस्तीत दिसुन आले नाही.

3) शासन निर्णय क्रमांक आविवि-2015/प्र.क्रं.78, दिनांक 18/11/2015 नुसार दिनांक 01/12/2015 पासुन रूपये 25/- प्रमाणे (गरोदर स्त्रियांना शेवटच्या तिमाहीमध्ये व स्तनदा मातेला बांळातपण नंतर पहिल्या तिमाहिमध्ये एक वेळ चौरस आहार देणे बाबत निर्देश असतांना, लेखापरीक्षण वेळी पंचायत समिती स्तरावरून मागणीपत्रे असेल तसेच अंगणवाडी / प्राथमिक आरोग्य क्रेन्दां मध्ये नोंदणी केलेल्या महिलांच्या नोंदीबाबत कोणताही दस्तोएवज नस्तीबध्द नसल्याने मागणी शिवाय केलेले शोधन मान्य करता येत नाही.

4) वरील शासन निर्णयानुसार ग्रामसभेच्या मान्यते नुसार आहार समिती नेमल्या बाबत दस्ताऐवज, तसेच साहित्य खरेदी आहार समितीच्या मान्यतेने केल्या बाबत खरेदी नोंदी बाबत नोंदवहया नाही.

5) स्तनदा मातेची वाढ तसेच नवजात बालकाचे जन्मापासुन वजन प्रत्येक महिण्यात घेणे बाबत निर्देश असतांना, लेखापरीक्षण वेळी नोंदपुस्तीका नस्ती बध्द नाही.

6) नस्ती सोबत 6 महिने ते 6 वर्ष गटातील लाभर्थ्याची नोंद अंगणवाडी सेविकेने स्वतंत्र नोंदवहीत केल्या बाबत बालक नोंदवही नस्तीबध्द नाही. तसेच आंगणवाडी स्तरावर स्थापन केलेल्या आहार समितीच्या बँक खात्या मध्ये पंचायत समितीने अनुदान वितरीत केल्याबाबत कोणताही दस्ताऐवज नस्तीबध्द नाही.

7) अंगणवाडी करीता गॅस पुरवठा केले बाबत चे दस्ताऐवज नही:- अनुदान वितरण दिनांक 31/03/2017 अन्वये रूपये 48,750/- वितरीत करण्यात आले. नस्तीनुसार अंगणवाडीना गॅस पुरवठा केल्याबाबत, तसेच सदर अनुदानातुन पाईप रूपये 190/- पुस्तिका रूपये 25/- चाचणी साठी रुपये 75/- व मुद्रांक शुल्क रूपये 100/- या प्रमाणे एकूण रूपये 390/- प्रमाणे प्रति अंगणवाडी ने वरील प्रमाणे साहित्य खरेदी केलयाबाबत दस्ताऐवज नस्तीबध्द नाही.

8) वरील धनादेश क्रमांक 205654, दिनांक 31/03/2017 रूपये 56,48,750/- बॅक ऑफ महाराष्ट्र मध्ये दिनांक 12/04/2017 मध्ये जमा झाल्याचे बॅक पासबुका नुसार दिसुन आले दिनांक 08/06/2017 ला रुपये 56,48,750/- पंचायत समिती रामटेक यांच्या खात्यात जमा झाल्याचे दिसुन आले आहे. म्हणजेच धनादेश बॅकेत जमा नसतांना, पंचायत समिती रामटेकला धनादेश देण्यात आल्याचे दिसुन आले.

**3.955 अंगणवाडी बांधकामाबाबत अनियमितता**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** महाराष्ट्र शासन महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्रमांक एबावि-2010/प्र.क्र.156/का-6, दिनांक 08/12/2012 नुसार सन 2011-2012 मध्ये एकुण मंजूर 60 अंगणवाडीला प्रती अंगणवाडी रूपये 4.50 लाख प्रमाणे रूपये 2,28,00,000/- निधी तसेच दिनांक 30/03/2013 नुसार 2012-2013 मध्ये मंजूर 35 अंगणवाडयांना रूपये 4.50 लक्ष प्रमाणे रूपये 1,57,50,000 व 2011-2012 मध्ये मंजूर 60 अंगणवाडयांचे उर्वरीत रक्कम रूपये 42,00,000/- असे एकुण रूपये 4,27,50,000/- निधी एकात्मीक बालविकास विभागादवारे संबंधीत ग्रामपंचायतींना 13 वा वित्त आयोग निधीतून वाटण्यात आलेले

आहे. याबाबत विभागाकडे असलेल्या नस्तीची सन 2016-2017 चे लेखापरीक्षण दरम्यान तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) नस्तीत असलेल्या यादीनुसार एकुण 95 मंजूर अंगणवाडी पैकी 57 अंगणवाडया पूर्ण असल्याचे नमुद आहे. परंतु, प्रत्यक्षात फक्त 12 अंगणवाडयांचे काम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र नस्तीत आहे. यावरुन फक्त् 12 अंगणवाडयांचे काम अदयाप पूर्ण झाले असून 45 अंगणवाडयांचे कामे अपूर्ण असल्याचे मत लेखापरीक्षणाचे आहे. (12 पूर्ण कामाचे सी.सी. नस्तीत आढळली नाही. फक्त् सी.सी.असल्याचे नोंद आहे).

2) सन 2011-2012 मध्ये मंजूर 60 पैकी 04 व 2012-2013 मध्ये मंजूर 35 पैकी 09 अंगणवाडी असे एकुण 13 अंगणवाडयांचे कामे अदयापही सुरु झाले नसल्याचे नस्तीत उपलब्ध् यादीनुसार दिसून येते. यामुळे रूपये 4.50 प्रती अंगणवाडी प्रमाणे रूपये 58,50,000/- ग्रामपंचायतीकडे अखर्चीत निधी गुतुंन असून अदयापही सदर निधी ग्रामपंचायतकडून वसुल करुन शासन खाती जमा करण्याची कार्यवाही विभागादवारे केले नाही.

3) मागणी करुनही एकुण मंजूर 95 अंगणवाडयापैकी 57 पूर्ण झालेले, अपूर्ण असलेले, 13 अदयापही काम सुरु न झालेले व 25 प्रगतीपथावर असलेले पूर्ण-अपूर्ण अंगणवाडी बांधकामाची विवरणपत्र विभागादवारे लेखापरीक्षणास सादर करण्यात आले नाही. त्यामुळे अंगणवाडी बांधकामाची सध्यास्थिती काय? याबाबत लेखापरीक्षणास काहीही भाष्य करता आले नाही.

4) महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक एबावि-2013/प्र.क्र.158/का-6, दिनांक 29/01/2014 नुसार 13 वा वित्त आयोगाचे प्राप्त निधी रूपये 67,00,000/- अखर्चित असल्यामुळे प्रमाणक क्रमांक 151 दिनांक 09/11/2016 शासन खाती जमा करण्यात आले आहे. परंतु, नस्तीत चलनाची मुळ प्रत नसल्यामुळे प्रत्यक्षात सदर रक्कम शासन खाती जमा झाली किंवा नाही, याची खात्री करता आली नाही.

**3.956 मौजा सिरेगांव टोला तालूका साकोली जिल्हा भंडारा येथील अंगणवाडी बांधकामातील अनियमिततेबाबत जिल्हा परिषद भंडारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत दोन प्रमाणकान्वये रक्कम रूपये 5,54,386/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तीका 1984 चे परीच्छेद क्रमांक 189 खालिल टिप-2 आणि महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परीपत्रक क्रमांक झेडपीए 2006/प्र.क्र.366/वित्त-9, दिनांक 31/12/2009 नुसार वृत्तपत्रात निविदा सूचना प्रकाशित केलेली नाही.

2) जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा मानव विकास समिती भंडारा यांचे प्रशासकीय मान्यता व निधी वितरण आदेश क्रमांक जिनिस/भं/माविका 15-16/प्र.मा./नि.वि./रां.क.नों.क्र.7/496, दिनांक 30/03/2016 मधील अट क्रमांक 02 नुसार जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या तज्ञ सिमितीने निविदा मंजूर केलेले नाही.

3) अंगणावाडी बांधकाम करनेबाबबत ग्रामपंचायत सिरेगाव टोला चे ग्रामसभेचे ठराव दिसून आले नाही करीता प्रशासकीय मान्यता व निधी वितरण आदेशातील अट क्रमांक 6 नुसार अंगणवाडी बांधकामाची गरज असलेबाबत लेखापरीक्षणास पडताळणी करता आली नाही. त्यामूळे अंगणवाडी बांधकामावर अनावश्यक खर्चाची शक्यता नाकारता येत नाही.

4) काम पूर्णत्व प्रमाणपत्र नमूना 65 सक्षम प्राधिका-याचे स्वाक्षरीने निर्गमित न करता कनिष्ठ अभियंता, राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा परिषद भंडारा यांचे स्वाक्षरीने नियमबाहय निर्गमित केलेले आहे.

5) अंगणवाडी बांधकामाचे झालेले मूल्यांकन रूपये 6,23,396/- करारनामा रूपये 5,85,920/- शी मर्यादीत करून निविदा दर 11.07 टक्के ने कमी करून मूल्यांकन रूपये 5,21,059/- करने आवश्यक असतांना रूपये 5,54,386/- जादा प्रदान झालेले आहे.

6) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक आयकर 1007/प्र.क्र.105/कोषा-प्र-5, दिनांक 22/02/2008 मधील तक्त्यामधील आयकर कपातीचे कलम 194 सी नुसार 2 टक्के आयकर रूपये 10,421/- (मूल्यांकन रूपये 5,21,059/- चे 2 टक्के) कपात करावयाचे असतांना आयकर रूपये 5,544/- कपात केल्यामूळे आयकर रूपये 4,877/- कमी कपात केलेले आहे.

7) महाराष्ट्र शासन, राजपत्र असाधारण भाग चार-ब, वित्त विभाग अधिसूचना, दिनांक 21/08/2014 नुसार स्वामित्व धन (रॉयल्टी) रूपये 19,963/- चे दहा टक्के रूपये 1,996/- मुल्यवर्धीत कर कपात केलेली नाही. त्यामूळे शासन महसूलाची हानी झालेली आहे.

8) उपअभियंता, राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा परिषद भंडारा यांनी पत्र क्रमांक 1479, दिनांक 14/10/2016 नुसार अद्यापही अंगणवाडीचे बांधकाम सुरू न केलेबाबतचे पत्र कंत्राटदाराला दिले असून मोजमाप पुस्तक क्रमांक 148 ला पायाचे खोदकामाचे मोजमाप दिनांक 20/10/2016 ला घेतल्याचे नमुद आहे. यावरून कंत्राटराने काम सुरू केलेले नसतांना मागील दिनांकात काम सुरू केल्याचे मोजमाप पूस्तकात दर्शविल्याचे दिसून येते.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 168 (1) (क) अन्वये कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी सदर कामाची 5 टक्के तपासणी केलेली नसतांनाही देयकाचे प्रदान केलेले आहे.

10) कंत्राटदार श्री.अनुराग मनोहर गिरीपुंजे, भंडारा यांची 11.07 टक्के कमी दराची निविदा स्विकारली असून महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक बीडीजी 2016/प्र.क्र.2/इमा.2, दिनांक 12/02/2016 मधील परिच्छेद क्रमांक 01 नुसार निविदेचा देकार निविदाधिन कामाच्या 10 टक्के पेक्षा अधिक दराने कमी असून कंत्राटदाराकडून इतक्या कमी दरात काम करण्याचे नियोजनाबाबत सविस्तर तपशिल मागिविलेले नाही. तसेच कंत्राटदाराने 11.07 टक्के कमी दराने काम केल्यास कामाचा गुणात्मक दर्जा कायम राहिल किंवा कसे याबाबत सक्षम प्राधिका-याने खात्री केल्याचे संचिकेत दिसून आले नाही.

11) चाचणी व परिक्षणानंतरच बांधकामाकरीता साहित्याचे वापर केलेबाबत तपासणी अहवाल (Testing report) शासकिय प्रयोगशाळेकडून प्राप्त न केल्यामूळे बांधकाम साहित्याचा दर्जाबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

12) सदर कामाचे प्राक्कलन (अंदाजपत्रक) मंजुर करतांना महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण 2010/(570/2010)/मोप्र-2, दिनांक 20/10/2010 नुसार बांधकाम साहित्य प्रत्यक्ष कामाचे जागेपासून प्रस्तावित वहन अंतरापेक्षा कमी अंतरावर उपलब्ध आहे किंवा कसे याबाबत कार्यकारी अभियंता यांनी खातरजमा केल्याचे दिसून येत नाही.

13) अंगणवाडी बांधकामाचे ई-निविदा सूचना क्रमांक 01/2016-17 ऑनलाईन प्रसिध्द (publish) केलेबाबतचे अभिलेखे सदर नस्तीत दिसून आले नाही. त्यामूळे महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएटी 10/2006/प्र.क्र.133/इमारती-2, दिनांक 02/11/2006 आणि महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2005/प्र.क्र.375/वित्त 9, दिनांक 30/12/2006 नुसार निविदा किमान कालावधी करीता मागविलेबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

**3.957 मौजा पळसगाव क्रमांक 01 तालूका साकोली जिल्हा भंडारा येथील अंगणवाडी बांधकामातील अनियमिततेबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** प्रमाणक क्रमांक 2709, दिनांक 31/03/2017 अन्वये रक्कम रूपये 5,32,162/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तीका 1984 चे परीच्छेद क्रमांक 189 खालिल टिप-2 आणि महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2006/प्र.क्र.366/वित्त-9, दिनांक 31/12/2009 नुसार वृत्तपत्रात निविदा सूचना प्रकाशित केलेली नाही.

2) जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा मानव विकास समिती भंडारा यांचे प्रशासकीय मान्यता व निधी वितरण आदेश क्रमांक जिनिस/भं/माविका 15-16/प्र.मा./नि.वि./रां.क.नौं.क्र.7/496, दिनांक 30/03/2016 मधील अट क्रमांक 02 नुसार जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या तज्ञ सिमितीने निविदा मंजूर केलेले नाही.

3) उपअभियंता, राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा परिषद भंडारा यांनी पत्र क्रमांक 1479, दिनांक 08/12/2016 नुसार अद्यापही अंगणवाडीचे बांधकाम सुरू न केलेबाबतचे पत्र कंत्राटदाराला दिले असून मोजमाप

पुस्तक क्रमांक 141 ला कामाचे मोजमाप दिनांक 16/10/2016 ला घेतल्याचे नमूद आहे. यावरून कंत्राटराने काम सुरू केलेले नसतांना मागील दिनांकात काम सुरू केल्याचे मोजमाप पूस्तकात दर्शविल्याचे दिसून येते

4) अंगणवाडी चे बांधकाम दिनांक 27/03/2017 रोजी पूर्ण झाल्याचे काम पूर्णत्व प्रमाणपत्राला नमूद केलेले असून श्री.दिपक केवळराम मेंढे, सदस्य जलव्यवस्थापण समिती, जिल्हा परिषद भंडारा तथा जिल्हा परिषद सदस्य, भंडारा वडद क्षेत्र-22 यांचे पत्र दिनांक 17/04/2017 नुसार मौजा पळसगाव येथील अंगणवाडीचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे सुरू असलेबाबत तक्रार केली असून सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद भंडारा ला आवक क्रमांक 255, दिनांक 20/04/2017 आणि आरोग्य विभाग, जिल्हा परिषद भंडारा ला आवक क्रमांक 04, दिनांक 24/04/2017 अन्वये प्राप्त झालेले आहे. करीता सदर अंगणवाडीचे बांधकाम पूर्ण झालेले नसतांनाही काम पूर्ण झाल्याचे दर्शवून कंत्राटदाराला अंतीम देयक प्रदान केल्याचे दिसून येते.

5) अंगणवाडी बांधकामाचे झालेले मूल्यांकन रूपये 6,12,173/- करारनामा रूपये 5,82,104/- शी मर्यादीत करून निविदा दर 13.07 टक्के ने कमी करून मूल्यांकन रूपये 5,06,024/- करने आवश्यक असतांना रूपये 5,32,162/- केल्यामूळे रूपये 26,138/- जादा प्रदान झालेले आहे.

6) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक आयकर 1007/प्र.क्र.105/कोषा-प्र-5, दिनांक 22/02/2008 मधील तक्त्यामधील आयकर कपातीचे कलम 194 सी नुसार 2 टक्के आयकर रूपये 10,120/- (मूल्यांकन रूपये 5,06,024/- चे 2 टक्के) कपात करावयाचे असतांना आयकर रूपये 5,322/- कपात केल्यामूळे आयकर रूपये 4,798/- (रूपये 10,120 - रूपये 5,322) कमी कपात केलेले आहे.

7) महाराष्ट्र शासन, राजपत्र असाधारण भाग चार-ब, वित्त विभाग अधिसूचना, दिनांक 21/08/2014 नुसार स्वामित्व धन (रॉयल्टी) रूपये 21,010/- चे दहा टक्के रूपये 2,101/- मुल्यवर्धीत कर कपात केलेली नाही. त्यामूळे शासन महसूलाची हानी झालेली आहे.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 168 (1) (क) अन्वये कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी सदर कामाची 5 टक्के तपासणी केलेली नसतांनाही देयकाचे प्रदान केलेले आहे.

9) कंत्राटदार श्री.अनुराग मनोहर गिरीपुंजे भंडारा यांची 13.07 टक्के कमी दराची निविदा स्विकारली असून महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक बीडीजी 2016/प्र.क्र.2/इमा.2, दिनांक 12/02/2016 मधील परिच्छेद क्रमांक 01 नुसार निविदेचा देकार निविदाधिन कामाच्या 10 टक्के पेक्षा अधिक दराने कमी असून कंत्राटदाराकडून इतक्या कमी दरात काम करण्याचे नियोजनाबाबत सविस्तर तपशिल मागिविलेले नाही. तसेच कंत्राटदाराने 13.07 टक्के कमी दराने काम केल्यास कामाचा गूणात्मक दर्जा कायम राहिल किंवा कसे याबाबत सक्षम प्राधिका-याने खात्री केल्याचे संचिकेत दिसून आले नाही.

10) चाचणी व परिक्षणानंतरच बांधकामाकरीता साहित्याचे वापर केलेबाबत तपासणी अहवाल (Testing report) शासकिय प्रयोगशाळेकडून प्राप्त न केल्यामूळे बांधकाम साहित्याचा दर्जाबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

11) सदर कामाचे प्राक्कलन (अंदाजपत्रक) मंजूर करतांना महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण 2010/(570/2010)/मोप्र-2, दिनांक 20/10/2010 नुसार बांधकाम साहित्य प्रत्यक्ष कामाचे जागेपासून प्रस्तावित वहन अंतरापेक्षा कमी अंतरावर उपलब्ध आहे किंवा कसे याबाबत कार्यकारी अभियंता यांनी खातरजमा केल्याचे दिसून येत नाही.

12) अंगणवाडी बांधकामाचे ई-निविदा सूचना क्रमांक 01/2016-17 ऑनलाईन प्रसिध्द (publish) केलेबाबतचे अभिलेखे सदर नस्तीत दिसून आले नाही. त्यामूळे महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएटी 10/2006/प्र.क्र.133/इमारती-2, दिनांक 02/11/2006 आणि महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए 2005/प्र.क्र.375/वित्त-9, दिनांक 30/12/2006 नुसार निविदा किमान कालावधी करीता मागविलेबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

**3.958 भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजनेतील अनियमितता.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 1) -** जिल्हा परिषद गोंदिया अंतर्गत एमात्मिक बाल विकास सेवा योजना सन 2016-17 चे लेखापरीक्षणास भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजने अंतर्गत नस्तीचे अवलोकन केले असतांना असे दिसुन येते की, प्राधिकारपत्र क्रमांक 5737945242142258015, दिनांक 22/03/2017 रक्कम रुपये 1,10,14,000/- कोषागारातून काढण्यात आलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक अविवी-2015/प्र.क्र.78/कार्यासन-8, दिनांक 18/11/2015 मधील नियम क्रमांक 2.1 नुसार आंगणवाडी/मीनी आंगणवाडी क्षेत्रातील सर्व गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांची आंगणवाडी केंन्द्रात नोंदणी करुन लाभार्थी यादी तयार करण्यास सुचविले असतांना लाभार्थ्यांची यादी नस्तीमध्ये आढळुन आलेली नाही.

2) बालविकास प्रकल्पांनी आंगणवाडी सेविका व मदतनीस यांना दिलेलया मानधनाच्या पोच पावत्या व उपयोगीता प्रमाणपत्र प्राप्त केले नसल्याचे दिसुन येते.

**3.959 रोखपुस्तकातील अनियमिततेबाबत**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** एकात्मिक बाल विकास व सेवा योजना व महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषद, गडचिरोली चे सन 2016-2017 चे लेखापरीक्षणाचे वेळी रोख पुस्तकाची दिनांक 25/10/2017 रोजी तपासणी केली असता अनुक्रमे रक्कम रुपये 89,099/- व रुपये 27,16,203.50/- शिल्लक असल्याचे आढळून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 13 व नियम 49 नुसार परिषदेच्या वतीने घेतलेल्या पैशाचा विहित नोंदवहीत हिशोब ठेवावा व अशा रकमेचा चालन तयार करुन विनाविलंब जास्तीत जास्त चोविस तासाचे आंत बँकेत किंवा कोषागारात भरणा करावा, अशी तरतूद आहे. परंतू, त्याचे पालन होत असल्याचे आढळून आले नाही. रक्कम रुपये 89,099/- वेतनामधील कपातीच्या रकमा जुलै 2017 ते सप्टेंबर 2017 कालावधीतील रकमा प्रलंबीत आहे. तसेच किरकोळ रोख पुस्तका अंतर्गत रक्कम रूपये 27,16,203.50/- शिल्लक आहे. पासबुकनुसार शिल्लक रक्कम रूपये 47,47,996.50/- एवढी आहे. रक्कम रुपये 20,31,793/- एवढी तफावत आहे. त्यापैकी रक्कम रूपये 1,28,350/- चा तपशील उपलब्ध् आहे रक्कम रूपये 19,03,443/- पासबुकमध्ये जादा आहे. ताळमेळ केलेला नाही. ही गंभीर अनियमितता आहे. सदर रकमा कशाच्या आहेत? याचा तपशील विभागाकडे नाही. तरी प्रलंबीत रक्कम संबंधीतांना पाठवून उर्वरीत रक्कमा तात्काळ शासन खाती जमा करुन विलंबाच्या कारणासह अनुपालन सादर करावे.

2) प्रलंबीत रक्कम लक्षात घेता महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 50, 56 व 57 नुसार कार्यवाही करुन रोखपुस्तक दैनिक शिल्लकेसह दररोज बंद करुन त्यावर अधिकाऱ्याची स्वाक्षरी करणे आावश्यक आहे. परंतू, तसे होत नसल्याचे दिसून आले. यावरुन तत्कालीन अधिकारी यांचे पर्यवेक्षकीय नियंत्रणाचा अभाव असल्याचे दिसून येते. तसेच लेखा संहिता 1968 चे नियम 50(2) नुसार तीन महिन्याचे वर प्रलंबीत रकमेबाबत वेळीच कार्यवाही केलेली नाही.

3) लेखा संहिता 1968 चे नियम 42 नुसार रोख पुस्तकातील शिल्लक रकमेची मासिक तपासणी, त्रैमासिक अचानक तपासणी झाल्याचे आढळून आले नाही.

**3.960 गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांना एक वेळचा चौरस आहार व 7 महिने ते 6 वर्षे वयोगटातील बालकांना अतिरिक्त आहार मधील अनियमितता**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** सन 2016-2017 मध्ये डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम अमृत आहार योजना राबविण्यात आली सन 2016-2017 मध्ये 2236-पोषण आहार कार्यक्रम 22360297(31) खाली जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती, गडचिरोली जिल्हा वार्षिक

आदिवासी उपयोजना व उपयोजना क्षेत्राबाहेरील योजना अंतर्गत आदेश क्रमांक नियो-15/नियो/निवि/का-6अ/1140, दिनांक 13/06/2016 व आदेश क्रमांक 280 दिनांक 20/03/2017 अन्वये अनुक्रमे 1195.66 + 327.25 = 1523.01 लक्ष ची तरतुद व प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

प्राप्त अनुदान रूपये 15,23,01,000/- पैकी रक्कम रुपये 11,20,96,755/- चे वाटप प्रकल्पांना केलेले आहे. दिनांक 31/03/2017 अखेर रक्कम रुपये 4,02,04,245/- एवढी रक्कम जिल्हा स्तरावर शिल्लक आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक आविवि 2015/प्र.क्र. 78/कार्यासन-8, दिनांक 11/11/2015 परि. क्रमांक 2 मार्गदर्शक सूचना 1 व 2 योजनेमध्ये गरोदर स्त्रिंया व स्तनदा माता निवडलेल्या लाभार्थीची यादी आंगणवाडी/मिनी आंगणवाडी केंद्रामध्ये नोंदणी करुन यादी तयार करावी त्याची पडताळणी संबंधीत प्राथमिक आरोग्य केंद्रात झालेल्या नोंदीनुसार करण्यात यावी, अशा सूचना आहेत. परि.3 3.3 (1) नुसार अनुसूचीत क्षेत्रातील सर्व गरोदर स्त्रिलया व स्तनदा मातांची आंगणवाडी सेविकामार्फत सर्वेक्षीत यादी जिल्हा स्तरावर एकत्रीत करुन अंतिम करावी, अशा सूचना आहे. परंतू, सन 2016-2017 ची लाभार्थी यादी नस्तीला आढळून आली नाही.

2) शासन निर्णय दिनांक 11/11/2015 परि. 3 नुसार अमृत आहार योजनेचे समन्वय व संनियंत्रण व मुल्यमापन योग्य होणेस्तव विहित केलेली कार्यपद्धती 3.3(2) जिल्हा स्तरीय अंमलबजावणी समिती योजनेतील कामाचा व फलनिष्पतीचा नियमीत आढावा घेण्यासाठी समितीच्या किमान दोन महिन्यातून एकदा बैठक घेणे आवश्याक आहे. तसे केल्याचे आढळून आले नाही. सभाचे इतिवृत्त नस्तीला उपलब्ध नाही.

3) शासन निर्णय दिनांक 11/11/2015 परि. क्रमांक 3.4(2) नुसार उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) जिल्हा परिषद आणि प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांनी एका महिन्यात किमान 10 आंगणवाडी/मिनी आंगणवाडीमधील आणि या योजनेमधील 5 गावामधील लाभार्थीची उपस्थिती अन्नाचा दर्जा व प्रमाण, भोजन शिजवितांना व वाढत असतानाची स्वच्छता, गरोदर स्त्रीच्या वजनातील वाढ, स्तनपान व लसीकरण याबाबत तपासणी करुन खरेदीचे लेखे तपासावे आणि त्याचा अहवाल जिल्हा स्तरीय अंमलबजावणी समितीसमोर परि. 3.3(3) नुसार सादर करणे आवश्यक आहे. परंतू, तपासणी करुन अहवाल सादर केल्याचे दस्तऐवज नस्तीला आढळून आले नाही.

4) शासन निर्णय दिनांक 11/11/2015 परि. क्रमांक 3.5 नुसार ग्रामपातळीवर 4 सदस्यीय आहार समिती एका आंगणवाडी/मिनी आंगणवाडीकरीता एक आणि चार सदस्यीय आहार समिती ग्रामसमिती मार्फत नियुक्त करण्यात येईल. समितीमध्ये महिला सरपंच / ग्रामपंचायत सदस्य, एक स्तनदा माता, एक गरोदर स्त्री सदस्या व आंगणवाडी सेविका सदस्य सचिव म्हणून राहील, अशी तरतुद आहे. सदर समितीमार्फत अमृत आहार योजनेची अंमलबजावणी करावयाची आहे. जिल्ह्यात अशा किती समिती कार्यरत आहेत, ज्याचे मार्फत योजना राबविली जाते? त्याचे अध्यक्ष/सदस्य कोण आहे? याचा तपशील जिल्हा स्तरावर महिला व बालकल्याण विभागाकडे उपलब्ध नाही.

5) सन 2016-2017 मध्ये टप्पा-1 नुसार गरोदर + स्तनदा माता यांना टप्पा-2 नुसार 7 महिने ते 6 वर्ष वयोगटाच्या बालकांना आहार देणेस्तव व आंगणवाडी सेविका व मदतनिस यांना आहार तयार करणेस्तव मानधन वाटपकरीता समितींना जिल्हा स्तरावरुन अनुदान त्याचे खात्यावर वाटप केलेले आहे. परंतू, त्यापैकी किती अनुदान खर्च झाले? किती समितीकडे शिल्लक आहे? किती लाभार्थींना फायदा झाला? याबाबत तपशील विभागाकडे उपलब्ध नाही. शासन निर्णय दिनांक 18/11/2015 परि. 3 व 3.3 (1) व (4) नुसार जिल्हा स्तरीय अंमलबजावणी समितीकडून योजनेच्या कामाचा, खर्चाचा, लागणाऱ्या अनुदानाचा व फलनिष्पत्तीचा नियमित आढावा घेणे आवश्यक आहे. परंतू, वेळोवेळी आढावा घेतला गेल्याचे नस्तीला आढळून आले नाही. तसेच अर्धसमास पत्र क्रमांक 2 दिनांक 07/11/2017 अन्वये माहिती लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे किती खर्च झाला? किती शिल्लक आहे? किती लाभार्थी आहे? किती लाभार्थींना फायदा झाला? याची शहानिशा करता आली नाही.

6) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) जिल्हा परिषद. गडचिरोली यांनी प्रकल्प अधिकारी एकात्मिक बाल विकास व समितीकडून उपयोगीता प्रमाणपत्र व फलनिष्पत्ती अहवाल प्राप्त केल्याचे आढळून आले

नाही. त्यामुळे एक वेळचा चौरस आहारामुळे गरोदर माता, स्तनदा माता यांचे वजनात व स्तनपानात वाढ झाली तसेच सकारात्मक फायदे झाले? याची आकडेवारी जिल्हास्तरावर उपलब्ध नाही.

7) शासन निर्णय दिनांक 11/11/2015 परि. क्रमांक 3.2 योजनेच्या सर्वकष संनियंत्रण व मुल्यमापनासाठी योजनेचे त्रयस्थ संस्थेमार्फत मुल्यमापन करणे, मोबाईल ॲप्लीकेशन तयार करणे, लाभार्थी यादी प्रणालीवर अद्यावत करणे, योजनेचे स्वयंसेवी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, सामाजिक संस्था इत्यादीमार्फत सामुदायिक संनियंत्रण (Community based Monitoring) करण्यात येईल, अशा मार्गदर्शक सूचना आहेत. परंतू, तसे केल्याचे नस्तीला दस्तऐवज आढळून आले नाही.

**3.961 अभिकरण आकार वसुली / प्रस्तावाबाबत**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 6) -** एकात्मिक बालविकास विभाग, जिल्हा परिषद, गडचिरोली अंतर्गत सन 2016-2017 मध्ये अभिकरण आकार कपात केला नाही. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक भविआ1099/ प्र.क्रं.3458, दिनांक 29/05/1999 जिल्हा परिषदेकडुन राबविण्यात येणा-या अभिकरण योजना प्रत्यक्ष खर्च (आस्थापना खर्च वगळून) अनुषंगाने जिल्हा परिषदांना 5 टक्के अभिकरण आकार अनुज्ञेय आहे. त्यापैकी 4 टक्के अभिकरण आकार प्राप्त अनुदानाच्या अनुषंगाने व 1टक्के अभिकरण आकार लेखापरीक्षण झाल्यानंतर शासनास प्रस्ताव पाठवुन प्राप्त करणेस्तव सुचना आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2016-2017 मधील अभिकरण आकार रक्कम रुपये 71,42,325/- कपात करुन जिल्हा निधीत जमा केल्याचे आढळून आले नाही. तरी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 123 खाली अभिकरण तत्वावर जिल्हा परिषदेकडे सोपविलेल्या योजनाच्या अनुषंगाने खात्री करुन अभिकरण आकार कपात करावा.

2) सन 2015-2016 मध्ये प्राप्त अनुदानाचे आधारे अभिकरण आकार कपात केलेला नाही. सन 2015-2016 मधील अखर्चित तरतुद खर्च करण्याची मुदत दिनांक 31/03/2017 होती. त्यामुळे आता सन 2015-2016 मधील प्रत्यक्ष खर्चाचे आधारे (आस्थापना खर्च वगळून) 5 टक्के येणारा अभिकरण आकार कपात करुन जिल्हा निधीत जमा करुन अनुपालन सादर करावे.

सन 2015-2016 पुर्वीची किती अभिकरण आकार येणे / देणेबाबत रजिस्टर विभागाकडे उपलब्ध नाही. तरी प्रत्यक्ष खर्चाचे आधारे येणार 5 टक्के अभिकरण आकारपेक्षा अनुदानाच्या आधारावर कपात केलेला 4 टक्के अभिकरण आकार कमी / जादा कपात केलेला असेल, तर तेवढी रक्कम शासनास जिल्हा परिषदेतर्फे जमा करण्याची कार्यवाही करण्यात यावी किंवा शासनास प्रस्ताव सादर करुन मागणी करावी. अभिकरण आकार घेणे/देणे रजिस्टर अद्यावत करण्यात यावे.